'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625,
Special Issue 224 (B) : Relevance of Gandhian Thoughts
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
February-2020

# महात्मा गांधीजींचे राजकीय विचार : एक अभ्यास

**प्रा. डॉ. दिलीप आर. चव्हाण**
जे.डी.एम.व्ही.पी.एस.
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
जळगाव

**प्रस्तावनाः**

महात्मा गांधी हे एक आदर्शवादी व अध्यात्मवादी असे महान पुरूष होते. बालवयात व उच्च शिक्षण घेत असताना त्यांच्या मनावर अनेक चांगले संस्कार झाले. विविध राजकीय विचारवंतांचा आणि धर्मिक ग्रंथाचा त्यांच्या मनावर खोलवर परिणाम झाला. रस्किर, टॉलस्टॉय, थोरो अशा विचारवंतांचा पगडा त्यांच्या मनावर बसला.

रस्किन या विचारवंताचे ``Unto this last`` हे पुस्तक गांधींच्या वाचनात आले. त्याचा फार मोठा परिणाम त्यांच्यावर झाला. गांधीजींनी जी सर्वोदयाची कल्पना मांडली, ती रस्किनच्या विचारांचे सार होय. सत्य, अहिंसा, सविनय कायदेभंग इत्यादी गोष्टी गांधीजी टॉलस्टॉयपासून शिकले. गांधीजींचे हे राजकीय जीवनकार्य पुढे घडले, त्या जीवनाची वैचारिक बेठक वरील विचारवंतांद्वारे तयार झालेली होती.

गांधीवाद, धार्मिक, मानवतावाद, सत्य, अहिंसा, सत्याग्रह, सत्याग्रहाचे मार्ग, विधायक कार्यक्रम, ग्रामराज्याची कल्पना, विश्वस्तवृत्ती, स्वराज्य, आंदोलन, धर्म आणि राजकारण साम्यवाद इत्यादी गोष्टीला चार राजकीय विचारात समाविष्ट करता येतात.

**उद्दिष्टे :**

१) गांधीजींच्या राजकीय विचारांच्या संकल्पनेचा शोध घेणे.
२) गांधीजींच्या राजकारण आणि अध्यात्मिकरण याविषयी तुलनात्मक अभ्यास करणे.
३) वर्तमान स्थितीत गांधीप्रणित राजकीय विचारांची आवश्यकतेविषयी अभ्यास करणे.

RESEARCH JOURNEY

**गृहीतके :**

१) गांधीजींचे राजकीय विचार हे राष्ट्राच्या उन्नत प्रगतीसाठी महत्त्वाचे ठरणारे दिसून येतात.
२) गांधीजींचे राजकीय विचार हे नैतिक, धर्मनिरपेक्ष व वैज्ञानिक दृष्टिकोन यातून मांडलेले विचार दिसून येतात.

**१) गांधीजींच्या विचारांची वैशिष्ट्येः**

गांधीजींनी मांडलेले, तत्त्वज्ञान गांधीवाद या नावाने ओळखले जाते.महत्मा गांधींचे स्वतःचे जीवन हा सत्य शोधनासाठी केलेला एक महान प्रयोग होता. गांधीजी जे बोलले त्याप्रमाणे त्यांचे आचरण होते. आचार, विचारातील अद्वैत हे त्यांचे वैशिष्ट्ये होय. त्यांचे तत्त्वज्ञान हे जीवनात त्यांनी प्रत्यक्ष घेतलेल्या अनुभवावर आधारीत होते. गांधीजींनीच एके ठिकाणी म्हटले आहे, ``गांधीवाद नावाचे, कोणतेही तत्व नाही आणि माझ्या पाठीमागे कोणताही असा पंथ चालू व्हावा अशी माझी इच्छा नाही.`` मी नवे तत्त्व किंवा सिद्धांत शोधून काढला असा दावा ही मला करावयाचा नाही.

काही मुलभूत तत्त्वावर श्रद्धा ठेवून त्या आधारे जीवनातील समस्यांची उकल करण्ऱ्या गांधीजींचा प्रयत्न होता. त्यांच्या सर्व विचारांना वास्तववादी बैठक लाभलेली दिसून येते. समाजातील अनिष्ट प्रवृत्ती दूर करून अधिक चांगला समाज कसा निर्माण करता येईल हा त्यांच्या समोर प्रश्न होता. यामुळे तो आपल्या समोर काही आदर्श कल्पना बाळगतो. गांधीजींनी असे आदर्श स्वतः समोर ठेवले होते. सत्य आणि अहिंसा या तत्त्वांची प्रस्थापना करण्यासाठी असहकार, सविनय कायदेभंग, उपवास इत्यादी मार्गीचा अवलंब केला, जुलूम आणि अन्यायाविरूद्ध अहिंसात्मक पद्धतीने त्यांनी मार्ग अवलंबले होते.

माणसामधील चांगूलपणावर त्यांच्यातल्या माणुसकीवर विश्वास हे गांधीजींच्या विचारांचे वैशिष्ट्य होते. विश्वासामुळेच हिंसेच्या विरूद्ध अहिंसेच्या मार्गाने, असत्याच्या विरूद्ध सत्याच्या मार्गाने आणि अन्यायविरूद्ध न्यायाच्या मार्गाने आपण यशस्वी लढा देऊ शकू अशी ख्याती गांधीजींना होती.



Scanned by CamScanner

ISSN : 2348-7143
February-2020

सत्तेचे केंद्रीकरण, मग ते आर्थिक सत्तेचे असो वा राजकीय सत्तेचे असो. माणसाला गुलाम बनविते. म्हणून त्यांचा आग्रह सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा होता. मोठ्या उद्योगधंद्यामुळे उत्पादनाचे केंद्रीकरण होते.

गांधीजी राजकीय कर्मयोगी होते, गांधीजींना ते विशेषण कदाचित लावता यायचे नाही. ते राजकीय सत्तेच्या कार्याचे व स्वरूपाचे पद्धतशीर व मुद्देसुद विवेचन त्यांच्या लेखनात, भाषणात आढळणार नाही. घटनांना व प्रसंगांना नवे वळण, नवा आशय प्राप्त करून देणे हा त्यांच्या विचारांचा हेतू होता, किंवा माणसाला नैतिक माणूस बनविणे ही त्यांच्यामागील प्रेरणा होती. अशा परिस्थितीत राजकीय सिद्धांतांना आकार देणे, गांधीजींना शक्यच झाले नाही. अराज्यवादी, मार्क्सवादी, उदारमतवादी लोकशाही, माओलेनिनवादी या सर्वच विचारसरणींशी त्यांचे विचार अधूनमधून जुळतात. पण कोणत्याच एका सच्यात त्यांना बसवता येणार नाही.

त्यांच्या राजकीय विचारांच दुसरे वैशिष्ट असे सांगता येईल की तो त्यांच्या धार्मिक, नैतिक, दार्शकि, आर्थिक, सामाजिक विचारात इतका मिसळून गेला आहे की, त्याच वेगळे अस्तित्व प्रतितच होत नाही. धार्मिक , नैतिक परिभाषेतच त्यांनी आपले राजकीय, विचार मांडलेले दिसून येतात. गांधीजींनी एके ठिकाणी असे म्हटल अहे की, ``माझी देशभक्ती ही चिरंतन स्वातंत्र्याच्या व शांततेच्या भूमीच्या माझ्या प्रवासातील टप्पा आहे. तेव्हा माझ्या मते धर्माशिवाय राजकारण नाही ही गोष्ट स्पष्ट आहे. राजकारण धर्माला सहाय्यभूत होते. त्यांच्यमते, धर्माचा राजकारणाशी संबंध नाही असे जे लोक म्हणतात त्यांना धर्माचा अर्थच कळत नाही. `विग्रह, विघटन, विद्रोह, विनाशादी प्रवृत्तींचे राजकारणातून उच्चाटन होऊन सहयोग समन्वय व संघटनावादी प्रवृत्तींचे त्या जागी प्रतिष्ठापणा करणे हे अध्यात्मीकरणाचे साध्य आहे.`

**२) राजकीय अध्यात्मीकरण :**

राजकारणला नैतिक आणि धार्मिक अधिष्ठान असावे, हा विचार गांधीजींचे राजकीय गुरू नामदार गोपाल कृष्ण गोखले यानी मांडला होता. त्याला प्रत्यक्षात आणण्याचे काम गांधीजींनी केले. त्यांच्या मते, राजकारण शाप न ठरता, वरदान ठरवायचे असेल, तर राजकारणाला आध्यात्मिक आणि नैतिक अधिष्ठान प्राप्त करून देणे गरजेचे ठरते.

अनेकांनी धर्मापासून राजकारण वेगळे करण्याचा प्रयत्न केला. मात्र गांधीजी धर्माला राजकारणापासून वेगळे करू इच्छित नव्हते. त्यांच्यामते, धर्मविहीन राजकारण म्हणजे मृत्यूचा सापळा असून असे राजकारण आत्म्याचा नाश करते. म्हणून गांधीजी म्हणत, ``माझ्या धार्मिक जीवनाला जर राजकारणाचा प्रतिबंध' होऊ लागला तर मी राजकारण सोडून देईन.`` गांधीजींचा धर्म हा कोणताही विशिष्ट धर्म नव्हता, गांधीजी सर्व धर्मांना समान मानत. त्यांच्या मते, राजकारण हे देखील समाजाविषयीच्या कर्तव्य भावनेतून केलेले कार्य असते.

**३) साध्य आणि साधन :**

गांधजींचे सर्वच चिार नैतिक मुल्यावर आधारित आहेत. गांधीजींच्य मते, जे उद्दिष्टे साध्य करावयाचे आहे ते शुद्ध असले पाहिजे. त्याचबरोबर ते प्राप्त करण्यासाठी वापरण्यात येणारी साधनेदेखील शुद्ध आणि नैतिक असली पाहिजेत. त्यांच्या मते अनैतिक साधने साध्याची नैतिकता नष्ट करतात. राजकारणातही गांधीजींनी नैतिकतेला प्राधान्य दिले. त्यांच्या मते, साधन व साध्य हे `बी` आणि `झाड` यांच्या प्रमाणे असून बी चांगले असेल तरच झाड चांगले राहील. गांधीजींच्या या विचारांवर भाष्य करताना स्टॅनले जोन्स म्हणतात, ``गांधीजींची साधन व साध्याबद्दलची धारणा मार्क्सवादी साम्यवादाच्य अगदी उलट आहे. साम्यवादाला ध्येय गाठण्यासाठी कोणतिही सा ने चालतात पण गांधीजी जेवढे ध्येय श्रेष्ठ पवित्र तेवढेच ते गाठण्यासाठीची साधने श्रेष्ठ आणि पवित्र मानत असत.``

**निष्कर्ष :**

महात्मा गांधींनी स्वातंत्र्य, बंधुता, धर्मनिरपेक्ष लोकशाही, विज्ञान निष्ठा, यासारखी मुल्ये प्रमाण मानत एकात्म भारताचे स्वप्न पाहिले होते ते अद्याप अपूर्ण आहे. जर गांधीजींच्या राजकीय परिप्रेक्षांतून बघावयाचे असेल तर आधी आपणास राज्यघटनेच्या कलम ६५ नसार धर्म, लिंग प्रांत भेद दूर सारून राकारणात नैतिकता धर्मनिरपेक्षता मुलभूत कर्तवय व हक्कांची जाणीव होणे गरजेचे आहे. तरच गांधीजींचे राजकीय विचार हे पुढच्या पिढीसाठी प्रेरणादायी असेन.



Scanned by CamScanner

**संदर्भ :**

१. पाटील बी. बी. भारतीय राजकीय विचारवंत, फडके प्रकाशन, कोल्हापूर. द्वितीय वृत्त, जून २००२.
२. पाटील वा. भा., आधुनिक राजकीय विचारवंत, प्रशांत पब्लिकेशन, प्रथमावृत्ती २००९.
३. भोळे भा. ल., आधुनिक भारतीय राजकीय विचार, पिंपळापुरे अॅण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, दुसरी आवृत्ती, जून २००३.
४. देवरे पी. डी., डॉ. डी. एस. निकुंभ, भारतीय राजकीय विचार, प्रशांत पब्लिकेशन, द्वितीय आवृत्ती, २०१२.
५. दै. लोकमत, संपादकीय, २ ऑक्टोबर २०१९, पृ.क्र. ०६.



Scanned by CamScanner